# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३३८ - २२ दिनांक -१४/११/२०२२

## पोलीस असल्याची बतावणी करुन फसवणुक करणाऱ्या आरोपीतास अटक करुन गुन्हयातील एकुण ६० ग्रॅम वजनाचे २,४४,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत. नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०१/१२/२०२१ रोजी फिर्यादी श्रीमती लक्ष्मी कमलराज राठोड, वय ६५ वर्षे यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, फिर्यादी या दिनांक ०१/१२/२०२१ रोजी भाजीपाला घेवून घरी येत असताना दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना पोलीस असल्याची बतावणी करुन त्यांची फसवणुक करुन त्यांचे गळयातील एकुण ६० ग्रॅम वजनाचे २,४४,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने फसवणुक करुन घेवून गेले आहेत. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ५४४/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४२०, १७०, ३४ प्रमाणे दोन अनोळखी इसमांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सदर गुन्हयाची उकल करण्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन मिळालेल्या तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपी आसीफ शबीर सय्यद इराणी यास दिनांक ०७/११/२०२२ रोजी अटक करुन त्याच्याकडून गुन्हयातील फिर्यादी यांची फसवणुक केलेले एकुण ६० ग्रॅम वजनाचे २,४४,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, तत्कालीन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो. आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नालासोपारा पोलीस ठाणे, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, पो.ना. सचिन कांबळे, अमोल तटकरे, पो.शि. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, प्रतिक पिंगळे, पो.ना.ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.



-----oooo-----